Govt YASHADA
Ref PUNE-411007.
No General Inward 160
No. & Date 3 - FEB 2012

**राज्य प्रशिक्षण धोरणानुसार प्रशिक्षणासाठी अधिकारी / कर्मचाऱ्यांची नावे न पाठविणाऱ्या संबंधित विभागप्रमुख/ अधिकाऱ्यांविरुध्द तसेच नामनिर्देशनानंतर प्रशिक्षणास उपस्थित न राहणाऱ्या प्रशिक्षणार्थीविरुध्द कारवाई करण्यासाठी सक्षम प्राधिकारी ठरविण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: टिआरएन-२०११/प्र.क्र.२८३ /११/१२-अ
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ३० जानेवारी २०१२

**वाचा :** शासन निर्णय क्रमांक- टिआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ, दि.२३ सप्टेंबर २०११

**प्रस्तावना:-**

राज्य शासन सेवेत सर्व स्तरावर कार्यक्षमता वाढवून गतिमान प्रशासन होण्याकरिता राज्यातील सर्व कर्मचारीवृंद यांना प्रशिक्षण देण्याच्या हेतूने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरण निश्चित करण्यात आले आहे. प्रस्तुत धोरण कार्यान्वित करण्यासाठी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरण राबविताना शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना वयाच्या कमाल ५५ वर्षापर्यंत प्रशिक्षण दयावयाचे आहे व प्रशिक्षणासाठी अधिकारी/कर्मचाऱ्यांची नावे न पाठविणाऱ्या संबंधित विभागप्रमुख /अधिकाऱ्याविरुध्द तसेच प्रशिक्षणास नामनिर्देशन झाल्यानंतर उपस्थित न राहणाऱ्या प्रशिक्षणार्थीविरुध्द कारवाई करण्यासाठी सक्षम प्राधिकारी ठरविणे आवश्यक आहे. याबाबत शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय:**

१) प्रशिक्षणासाठी अधिकारी/कर्मचाऱ्यांची नावे न पाठविणाऱ्या संबंधित विभागप्रमुख / अधिकाऱ्याविरुध्द तसेच नामनिर्देशनानंतर प्रशिक्षणास उपस्थित न राहणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यासाठी राज्य आणि विभागीय स्तरासाठी **सक्षम प्राधिकारी** म्हणून **मा. मुख्य सचिव** यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

२) प्रशिक्षणासाठी अधिकारी/कर्मचाऱ्यांची नावे न पाठविणाऱ्या संबंधित विभागप्रमुख / अधिकाऱ्यांविरुध्द तसेच नामनिर्देशनानंतर प्रशिक्षणास उपस्थित न राहणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यासाठी जिल्हा व त्याखालील स्तरासाठी **सक्षम प्राधिकारी** म्हणून **विभागीय आयुक्त** यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१२०१३००६०३०४१४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( के. पी. बक्षी)**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

(कृ.मा.प.)

प्रति -

१ मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
२ मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/खाजगी सचिव
२. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/खाजगी सचिव
४ सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, मंत्रालयीन विभाग
५ विभागीय आयुक्त, सर्व
६ महासंचालक, यशदा, बाणेर रोड, पुणे-४११ ००७
७ जिल्हाधिकारी, सर्व
८ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
९ मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक
१० प्रधान सचिव (सेवा ) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,
११ प्रधान सचिव, मा.मुख्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
१२ उप सचिव, साप्रवि/१२-अ यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१३ निवड नस्ती-१२-अ, साप्रवि, मंत्रालय, मुंबई

D:\Sabane/G.R